# Navshakti

## Cholamandalm Partnership With Ola

**Date: 07/07/2015 | Edition: Mumbai | Page: 12 | Source: Bureau | Clip size (cm): W: 12 H: 9**


India Media Monitor



## वाहन चालकांना कर्ज देण्यासाठी चोलामंडलमची 'ओला' सोबत भागीदारी

मुंबई : चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेडने मोबाईल ॲपवर कार्य करणाऱ्या भारतातील आघाडीच्या ओला कॅब बरोबर सामंजस्य करार केला आहे. या करारात वाहन चालकांना ऋण देण्याची योजना आहे. यामध्ये ओलाच्या व्यासपीठावर वाहन चालकांना सध्याच्या मासिक ईएमआय ऐवजी दैनंदिन परतफेडीचा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे. ओला यांनी वाहन चालकांसाठी 'प्रगती' कार्यक्रमाला फेब्रुवारी २०१५ मध्ये सुरुवात केली. या कार्यक्रमांतर्गत असे जाणवले आहे की ड्राइव्हर उद्योजकांसाठी दैनंदिन परतफेडीचा पर्याय हा अतिशय सुलभ असा आहे कारण या वाहनचालकांना दररोज उत्पन्न मिळते. ओला यांच्याकडून वाहन चालकांसाठी आपली स्वतःची कार विकत घेण्यासाठी रुपये १०० कोटींचा निधी उपलब्ध केला आहे.